प्रेस नोट दि.२२.०४.२०१५

प्रति,

संपादक

---------------------

विषय:- ८ वर्षापासुन पाहीजे असलेला आरोपी यांस स्था.गु.शा. करवी अटक केले बाबत..

------ooooo-----

दि.१३.०४.२००४ ते दि.१०.०१.२००५ पावेतो प्राथमीक शिक्षक पतसंस्था अमळनेर मध्ये आरोपी विनोद मधुकर बावीस्कर रा.अमळनेर यांने व त्याचे साथीदार यांनी संस्थेमधील १४,५००००/- रुपये ठेवीचे रकमेपैकी १३,००,०००/-रकमेचा संगनमताने ओव्हरड्रॉप काढुन स्वताचे फायद्यासाठी वापरली त्या बाबत अमळनेर पो.स्टे.ला दि.०८.०९.२००७ रोजी दिलीप गोवींदा पाटील चेअरमन प्राथमीक शिक्षक पतसंस्था अमळनेर यांचे फिर्याद वरुन गुरनं.१७०/२००७ भादवि कलम ४०८,४२० प्रमाणे गुन्हा रजिष्टरी दाखल करण्यात आला होता.त्यात ५ आरोपीतांना अटक करण्यात आली होती व आरोपी विनोद मधुकर बावीस्कर रा.अमळनेर हा गुन्हा दाखल झाले पासुन फरार होता.

मा. पोलीस अधिक्षक डॉ जालिंदर सुपेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पी.के. रायते याचे पथकातील पोहेकॉ उत्तमसिंग पाटील,पोहेकॉ बापुराव भोसले,पोना ईश्वर सोनवणे,पोकॉ बापु पाटील यांनी वरील आरोपी हा आखजी सणा निमीत्त अमळनेर शहरात येणार असल्याची माहीती मिळुन आल्याने त्यांस आज रोजी अमळनेर शहरात देशमुख नगर भागात सापळा रचुन त्यांस ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कार्यवाही साठी अमळनेर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक

स्थानिक गुन्हे शाखा जळगांव